# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/02/2024 (गुरूवार) सकाळ

---

**मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण यांचे**
**पोलीस स्टेशन सावनेर हद्दीत गंभीर गुन्हे प्रतिबंध आणि कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्याकरीता करावयाच्या उपाययोजना बाबत पोलीस स्टेशन सावनेर ठाणेदार यांना आदेश**

मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण श्री. हर्ष पोद्दार यांनी नागपूर ग्रामीण अंतर्गत येणाऱ्या पोलीस ठाणे सावनेर हद्दीत मालमत्तेसबंधी गुन्हयात लक्षणीय वाढ होत असल्याचे लक्षात घेता तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधीत राखण्याकरीता खालील नमुद सुचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत पोलीस स्टेशन सावनेर येथील ठाणेदार यांना आदेश दिलेले आहेत ते खालीलप्रमाणे आहेत.

पोलीस ठाणे सावनेर हद्दीत संवेदनशिल ठिकाणी आठवडयात ०३ वेळा अचानक नाकाबंदी, पोलीस स्टेशन सावनेर पोलीस निरीक्षक यांची स्वत: दररोज सायंकाळी १९.०० वा. ते २१.०० वा. दरम्यान वर्दळीचे ठिकाणी पायदळ पेट्रोलींग याप्रमाणे कार्यवाही करतील. पोलीस ठाणे सावनेर हद्दीत सकाळी ११.०० वा. ते सायंकाळी १९.०० वाजता पावेतो फिक्स पॉईन्ट लावतील. पोलीस निरीक्षक सावनेर यांचेद्वारे हद्दीतील व्यापारी सघंटनेचे वॉटसअॅपवर ग्रुप तयार करून दरमहा बैठक घेतील. व्यवसायीक ठिकाणी काम करणारे कामगार यांचे चारीत्र्य पडताळणी करण्याबाबत व्यापारी संघटनांना कळवतील. सावनेर परिसरातील प्रतिष्ठीत गावकऱ्यांची बैठक, सपोनि., वाहतुक शाखा नाग्रा तसेच पोलीस निरीक्षक सावनेर यांचे समन्वयाने सावनेर परिसरातुन जड वाहतुक सबंधाने मार्गाचे नियोजन करतील. पोलीस निरीक्षक सावनेर हे शहरात येणारे जड वाहनाव्यतिरिक्त ईतर जड वाहन सावनेर वळण मार्गावरून परावर्तीत करण्याचे नियोजन करून उंच अडथळा (Height Barrier) लावणे संबंधाने पत्रव्यवहार तसेच मार्गावरील अनधिकृत अतिक्रमण हटविणे संबंधाने नगर परिषद यांचे सोबत पत्रव्यवहार करतील अशा प्रकारचे आदेश दिलेले आहेत.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर